क्र.अँकब्यु/अे-३/संगणक- प्रिंटर/वार्षिक देखभाल करार/ २०२५/३३४
अँन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई, वरळी पोलीस कॅम्प,
सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०
दिनांक ०८/०१/२०२५

**-: दरपत्रकाबाबतच्या सुचना :-**

**विषय :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म,राज्य, मुंबई या कार्यालयातील संगणक व प्रिंटर यांचा वार्षिक देखभाल करार करण्याबाबत.**

******

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई मुख्यालय या कार्यालयातील ३५ संगणक व २५ प्रिंटर यांचा वार्षिक देखभाल करार करावयाचा आहे.

वार्षिक देखभाल करार करण्यास इच्छुक असणाऱ्या पुरवठादार कंपनीकडून कॉम्प्रेहेन्सिव्ह व नॉन कॉम्प्रेहेन्सिव्ह तत्वावर करण्याकरिता दरपत्रके मागविण्यात येत आहेत. अशी दरपत्रके ही दि. १७/०१/२०२५ रोजीपर्यंत सादर करावीत. याबाबतच्या अटी व शर्तीचा सविस्तर तपशील पुढीलप्रमाणे आहे.

--००अटी व शर्ती०००---

१. सीलबंद दरपत्रके दि. १७/०१/२०२५ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये सायंकाळी १८.१५ वा पर्यंत कार्यालयात जमा करावी. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२. मोहोरबंध लिफाप्यांवर संगणक व प्रिंटर वार्षिक देखभाल करार असे लिहिणे आवश्यक आहे. एका पुरवठादारास एकच निविदा सादर करता येईल. तसेच संगणकांचे कॉम्प्रेहेन्सिव्ह व नॉन कॉम्प्रेहेन्सिव्ह व प्रिंटर यांचे कॉम्प्रेहेन्सिव्ह व नॉन कॉम्प्रेहेन्सिव्ह दर वेगवेगळे दिसतील त्याप्रमाणे नमूद करण्यात यावे.

३. दरपत्रक फॉर्मवर दरपत्रक धारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक आहे.

४. दरपत्रक मोहोरबंध लिफाफे उघडतेवेळी दरपत्रधारक स्वत: किंवा त्याचा एक प्रतिनिधी स्वखर्चाने उपस्थित राहू शकतो.

५. दरपत्रक कागदपत्रात कुठेही खाडाखोड/ ओव्हरराईटिंग (गिरवणे) पांढरी शाई लावणे टाळावे. चुकुन तसे करावे लागल्यास त्यावर पूर्ण स्वाक्षरी करावी.

६. दरपत्रक धारक कंपनीने या कार्यालयातील अधिकाऱ्यांबरोबर हितसंबंध नसल्याबाबत आणि एकच निविदा दिल्याबाबतचे हमीपत्र दरपत्रकासोबत दयावे.

७. कोणतेही एक अथवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा, संपूर्ण प्रक्रिया पूर्णपणे किंवा दरपत्रक स्वीकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार, हे कार्यालय राखून ठेवत आहे.

८. दरपत्रके दि. २०/०१/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर पोलीस अधीक्षक मुख्यालय यांचे दालनात उघडण्यात येतील.

Scanned with OKEN Scanner

९.	दरपत्रके स्वीकारण्याबाबतचा अंतिम निर्णय या कार्यालयाचे विभाग प्रमुख यांचा राहिल.

या कार्यालयास प्राप्त होणारी तीन किंवा त्यापेक्षा अधिक दरपत्रकांच्या तुलनात्मक किंमतीतील न्यूनतम दर असलेल्या कंपनीशी वार्षिक देखभाल करार करण्यात येईल, याची संबंधित कंपन्यांनी नोंद घ्यावी. तसेच आमंत्रणाच्या पत्रात विनिर्दिष्ट केलेल्या अटीचे पालन करण्यात यावे.

(अरुण पाटील)
अपर पोलीस अधीक्षक (मुख्या-२)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

सर्व इच्छुक कंपन्या.

प्रत कार्यवाहीस्तव
पोलीस निरीक्षक, वेब कक्ष, लाप्रवि, म. राज्य, मुंबई.
२/-	उपरोक्त पत्राची प्रत सोबत जोडली असून, सदरचे पत्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे संकेतस्थळावर दि.१५/०१/२०२५ पर्यंत प्रसिध्दी राहील याप्रमाणे प्रसिध्द करण्यात यावे.

Scanned with OKEN Scanner